**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

पृ.शी./मु.शी. : नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, श्री.रामदास कदम यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, श्री. सतेज पाटील यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, श्री.अशोक उर्फ भाई जगताप यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, श्री.गिरीश व्यास यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

सभापती महोदय, श्री.प्रशांत परिचारक यांचा आपणांस व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

-----

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पृ.शी./मु.शी. : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे

सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त सभेत आज, बुधवार दिनांक 9 मार्च, 2016 रोजी राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहापुढे ठेवतो.

सभापती : विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-------

नंतर बी.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मा.राज्यपालांच्या अभिभाषणासंदर्भात सुरू करण्यात आलेली नवीन प्रथा**

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, एक नवीन प्रथा आम्ही सभागृहामध्ये पाहिली. कदाचित त्यासंबंधी आम्हाला माहिती नसेल. ती सभागृहाला माहीत व्हावी यासाठी आपल्याला विनंती आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाल्यानंतर माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडला. यापूर्वी अशा प्रकारची प्रथा आपल्याकडे नव्हती. आपण कोणत्याही नवीन प्रथेचे स्वागत करू या. त्यासाठी हरकत नाही. परंतु, लोकशाहीला पद्धतीनुसार विधान सभा व विधान परिषद या दोन्ही सभागृहाचे सार्वभौमत्व टिकवून त्याबाबतीतील माहिती सन्माननीय सदस्यांना दिली असती तर त्याला जास्त महत्व आले असते. त्याला उंची आहेच. महाराष्ट्र ही जी नवीन प्रथा सुरू केली आहे.....

(अनेक सन्माननीय सदस्यांचे हात बोलण्यासाठी वर असतात.)

**सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील दोन्ही सदनामध्ये ही प्रथा माननीय अध्यक्ष,विधान सभा आणि मी स्वत:हून सुरू केलेली नाही. याची पार्श्वभूमी अशी आहे की, उत्तर प्रदेशचे माननीय राज्यपाल श्री.राम नाईक हे आपल्या महाराष्ट्रातील आहेत. त्यांनी केंद्र शासनाला पत्र लिहिले होते. माझ्या समजूतीने केंद्र शासनाची एक उच्चस्तरीय समिती आहे. त्या समितीने एक इलॅबॉरेट प्रोसिजर तयार केली आहे. या प्रोसिजर नुसार सन्माननीय राज्यपाल येतात तेव्हा त्यांना नॅशनल सॅल्युट देण्यात यावी असे सुचविले आहे. त्यानंतर माननीय अध्यक्ष, विधान सभा व मी तसेच संसदीय कार्यमंत्री असे मिळून आम्ही त्यांना मध्यवर्ती सभागृहामध्ये घेऊन जातो. तेथे त्यांचे अभिभाषण होते. दोनदा राष्ट्रगीत होते. राष्ट्रगीत झाल्यानंतर ते खाली येतात. त्याच्या आधी, दिल्लीवाल्यांनी सांगितले आहे की, पार्लमेंट अफेअर्सकडून व्होट ऑफ थॅंक्स देण्यात यावे. त्यासाठी हे आले होते. आता परिस्थिती अशी आहे की, माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे बजेट अधिवेशनाच्या सुरूवातीला होते. आपल्याला एक करता आले असते की, ही प्रोसिजर पिजन होलमध्ये देता आली असती. परंतु, ते झाले नाही. तेव्हा यावर जास्त इश्यू न करता आपण पुढे जाऊ या.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी हा विषय सुरुवातीलाच मांडला आहे. त्या मागे अवमान करण्याची जराही माझी भावना नाही. उलट केंद्र सरकारने दोन्ही सभागृहाला काय सांगितले ते आपण सांगितले. मग या सभागृहाचे सार्वभौमत्व हे केंद्र शासनाच्या हाती आहे काय, असा प्रश्न निर्माण होईल. आपल्या घटनेनुसार सभागृहामध्ये जे काही बदल, प्रथा, परंपरा ज्या काही सुरू करायच्या असतील तो अधिकार आपल्याला आहे. तसे आपल्या संविधानामध्ये आहे. त्या गोष्टीला आमचा आक्षेप नाही. सभापती महोदय, आपण देखील म्हणाला की, हे केंद्र शासनाकडून आलेले आहे. त्यामुळे हे अयोग्य राहील. भारतीय लोकशाहीमध्ये संपूर्ण भारतातील विधान सभा, विधान परिषदा, कॉर्पोरेशनची सभागृहे तेथे या प्रथा सुरू होतील आणि ते दुर्दैवी असेल. भारताच्या लोकशाहीला ते घातक असेल. आम्ही संविधानाच्या चौकटीत राहून बोलत आहोत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आम्ही देखील आभार मांडणार आहोत.

**सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, विषयांतर होत आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, विषयांतर होत नाही.

**सभापती :** आपण थांबावे. आता सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे बोलतील. आजचा पहिला दिवस असल्यामुळे सर्वांनीच या विषयावर बोलले पाहिजे असे नाही.

श्री.सुनील तटकरे : हा मुद्दा प्रतिष्ठेचा नाही. आपल्या सभागृहाच्या कामकाजामध्ये ....

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, हे केंद्र सरकारने केलेले नसूल ते लोकसभेच्या माध्यमातून आलेले आहे एवढेच मला निदर्शनास आणावयाचे आहे. बाकी काही बोलावयाचे असेल तर त्यावर सन्माननीय सदस्यांनी जरूर बोलावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी सन्माननीय मंत्री श्री.खडसे साहेबांना सांगू इच्छितो की, आज आपण सत्तेमध्ये आहात म्हणून असे बोलत आहात. उद्या आपण विरोधी बाजूला याल तेव्हा असेच म्हणाल.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, आपण ज्येष्ठ सदस्य आहात. यात दोन्ही सभागृहाच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न येतो असे मला वाटत नाही. ही चर्चा उगाचच वाढविण्यापेक्षा ....(अडथळा)... माझे एकून घ्यावे. मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, आपण खाली बसून बोलू नका. माझ्या समोर पत्र ठेवण्यात आलेली आहेत. ती पत्र राष्ट्रपती भवनातून आलेली आहेत. आपण एक असे करू या की, ही चर्चा येथे थांबवू या. आमच्याकडे जो काही कागदपत्रांचा व्यवहार झालेला आहे तो सन्माननीय सदस्यांच्या पिजनहोलमध्ये ठेवण्यात येईल. उशिरा का होईना तो पत्रव्यवहार पिजनहोलमध्ये ठेवण्यात येईल. तो पत्रव्यवहार आपण वाचून घ्यावा. मग आपण त्यावर अवश्य चर्चा करू या. आपल्या सार्वभौमत्वाला कुठे काही बाधा येईल असे आपण करू नये. आता सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे बोलतील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण येथे चांगली भूमिका मांडली आहे. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये क्रमांक तीन मध्ये राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव असा क्रम दर्शविण्यात आलेला आहे. माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाल्यानंतर आभार प्रदर्शन झाले असून आता कामकाज पत्रिकेवर दर्शविण्यात आलेले आभार प्रदर्शन डिलिट होणार काय एवढाच माझा मुद्दा आहे. बाकी कोणताच मुद्दा नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आपण दोन दिवस चर्चा करतो. पुढच्या वर्षी राज्य सरकार नेमके काय करणार आहे त्याचे प्रतिबिंब अभिभाषणामध्ये असते. त्यामुळे विधान सभा व विधान परिषद माननीय राज्यपालांच्या प्रती आभार प्रदर्शन करते. त्यामुळे हे आता रद्द होणार आहे काय एवढाच प्रश्न आहे.

**सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आभार मानलेले नाहीत. राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवणे एवढाच आता पर्यंत कार्यक्रम झालेला आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमधील तीन मध्ये राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव दर्शविण्यात आलेला आहे.

श्री.शिवाजीराव देशमुख : सभापती महोदय, विधान सभा आणि विधान परिषदेमध्ये जे काही नियम, प्रथा, घटना या दृष्टीने जे काही अचूक असेल त्याप्रमाणे आपले कामकाज करण्याची प्रथा आहे. मी गेली अनेक वर्ष विधान सभा आणि विधान परिषदेचा सदस्य आहे. ही प्रथा मी फक्त आजच बघितली आहे. माननीय राज्यपाल महोदय येतात ते दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना एकत्रितपणे संबोधतात. ते आल्या नंतर व गेल्या नंतर राष्ट्रगीत होते. तथापि, माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांनी स्टेजवरून आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव मांडल्याचे मी आता पर्यंत कधीही पाहिलेले नाही. अशा नवीन प्रथेचे आदेश राष्ट्रपती भवनातून आदेश आले असतील, मघाशी सांगितल्याप्रमाणे लोकसभेकडून आदेश आले असतील तर त्यासंबंधात दोन्ही सदनाच्या विरोधी पक्ष नेत्यांना, गट नेत्यांना अगोदर सांगून कन्फर्म करून घेतले असते तर योग्य झाले असते.

श्री.कपील पाटील : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिला आहे तो अंतिम आहे. त्यावर मी कोणताही आक्षेप घेत नाही. माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी माननीय राज्यपाल महोदयांचे आभार मानले की नेमके काय केले हे आम्हाला गोंधळात ऐकू आले नाही. माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. आभार मानण्याचा अधिकार हा सभागृहाचा आहे. प्रस्ताव ते मांडतात. आणि तो मंजूर करण्याचा अधिकार आहे. आभार मानून झाले असतील तर पुढेच कामकाज घ्यावे.

यानंतर श्री.जुन्नरे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : आमदारांचे अधिकार कोणीही काढून घेऊ शकत नाही एवढे मी या निमित्ताने आपणास सांगू इच्छितो.

श्री.गिरीश बापट : माननीय सभापती महोदय, सभागृहात माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणाच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा होत आहे. आजच्या दिवसभराच्या कार्यक्रमाची पत्रिका आपल्याला देखील अवगत झाली होती. माझ्या संदर्भात विषय निघाला तेव्हा राष्ट्रपती भवन आणि लोकसभेतून आपल्याला जो कार्यक्रम दिला होता त्याच प्रमाणे कार्यक्रम झालेला आहे. यामध्ये माननीय राज्यपाल महोदयांना सलामी देण्याचा विषय नवीन झालेला आहे. या अगोदर माननीय राज्यपाल महोदयांना सलामी दिली जात नव्हती. नेहमीच्या कार्यक्रमानुसार माननीय राज्यपाल महोदयांना मिरवणुकीने नेले गेले. माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण झाल्यानंतर संसदीय कार्यमंत्र्यांनी आभार मानावेत असे पत्र वरुन आले होते त्यानुसार माननीय सभापती व माननीय अध्यक्षांनी मला तसे सांगितले. खरे म्हणजे हा आपल्या कार्यक्रमातील एक भाग असल्यामुळे मला आभार मानावयास सांगण्यात आले त्यानुसार मी माननीय राज्यपाल महोदयांचे आभार मानले.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आता माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचा संकेत या ठिकाणी आम्हाला समजावून सांगितला गेला आहे. आपल्याला यासंदर्भात ज्या काही नवीन सूचना प्राप्त झाल्या होत्या त्या आपण येथे सांगितल्या आहेत. परंतु प्रत्यक्षात जे घडले त्यामधून स्पष्टपणे असे जाणवले की, संसदीय कार्यमंत्री राज्यपाल महोदयांचे आभार मानणार आहेत याची कल्पना माननीय राज्यपाल महोदयांना नव्हती. दोन मिनिटांच्या अवधीमध्ये माननीय राज्यपाल महोदय राष्ट्रगीतासाठी उभे राहण्याचा प्रयत्न करीत होते, जर अगोदरची सूचना असेल तर संसदीय कार्यमंत्र्यांना व्यासपीठावर येऊन बोलण्यासाठी जी व्यवस्था करावयास पाहिजे होती ती व्यवस्था आपल्या यंत्रणेने केलेली नव्हती. त्यामुळे संसदीय कार्यमंत्र्यांनी सेंट्रल हॉलमध्ये आभार मानले की, अजून काय बोलले हे आम्हाला कोणालाही ऐकू आलेले नाही.

**सभापती :** संसदीय कार्यमंत्री आभार प्रदर्शनाच्यावेळी काय बोलले ते त्यांनी सांगावे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम हा माननीय राज्यपाल महोदयांकडूनच आला होता व त्यामध्ये आभार प्रदर्शनाचा उल्लेख होता. आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम पहिल्यांदाच सुरु झाला आहे. प्रथेप्रमाणे माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण संपल्यावर

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट...

सगळेजण उभे राहिले, त्यामुळे माननीय राज्यपाल महोदयांनी संबोधीत केलेल्या भाषणाबद्दल त्या ठिकाणी उपस्थित असलेले माननीय सभापती, माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री तसेच विरोधी पक्षाचे गट नेते या सर्वांचे आभार मानण्याचा तो प्रस्ताव होता. आता सभागृहाच्या पुढील कामकाजास सुरुवात करावी अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

**सभापती :** आता शेवटी विरोधी पक्ष नेते या विषयाच्या संदर्भात आपले विचार मांडतील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणानंतर जो विषय समोर आला होता तो आम्ही पाहिला आहे. त्यावेळी थोडी चूक झाली होती. जी काही चूक झाली होती त्याबद्दल आम्हाला सदनात थोडे तरी बोलावे लागणार आहे. जर अशा पध्दतीच्या कार्यक्रमामध्ये संसदीय कामकाज मंत्री माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या संदर्भात आभार मानणार होते तर त्याबाबतीत वेगळी व्यवस्था संसदीय कामकाज मंत्र्यांची असावयास पाहिजे होती ती नव्हती. माननीय राज्यपाल महोदयांच्या माईकवरुन संसदीय कामकाज मंत्री आभार मानावयास उभे राहिले होते. संसदीय कामकाज मंत्र्यांनी माईकवरुन आभार मानले असते तर आम्हाला ते ऐकू आले असते. परंतु ते माईकवरुन बोलले नाहीत. माननीय राज्यपाल महोदयांच्या माईकवरुन संसदीय कामकाज मंत्री बोलले तर ते राजशिष्टाचाराला धरुन होणार नाही यासंदर्भात खालून सूचना गेल्यानंतर संसदीय कामकाज मंत्री माईकच्या बाजूला झाले. खरे म्हणजे संसदीय कामकाज मंत्री हे माननीय राज्यपाल महोदयांकडे पाठकरुन माननीय राज्यपाल महोदयांचे आभार मानत होते. खरे म्हणजे हे राजशिष्टाचाराला धरुन होते काय ? हे जर राजशिष्टाचाराला धरुन नसेल तर त्या बाबतीत संसदीय कामकाजमंत्र्यांनी खेद व्यक्त केला पाहिजे, खंत व्यक्त केली पाहिजे.

**सभापती :** आता पुढील कामकाज पुकारले जावे.

------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत पटलावर ठेवणे

सचिव : महोदय, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत आज, बुधवार दिनांक 9 मार्च, 2016 रोजी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत मी सभागृहापुढे ठेवतो.

**सभापती :** विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(सोबत जोडलेले अभिभाषण जोडावे.)

------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव

**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शन करणारा श्री. पांडुरंग फुंडकर यांचा प्रस्ताव.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो."

ॲड.अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास मी दुजोरा देतो.

**सभापती :** प्रस्ताव असा आहे की :-

"राज्यापालानी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधान परिषदेचे सदस्य, त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सोमवार दिनांक 14 व मंगळवार दिनांक 15 मार्च, 2016 रोजी या प्रस्तावावर चर्चा करण्यात येईल.

या प्रस्तावास ज्या सदस्यांना सुधारणा सुचवावयाच्या असतील त्यांनी त्या गुरुवार दिनांक 12 मार्च, 2016 रोजी सायंकाळी 5 वाजेपर्यंत, कक्ष क्रमांक 017, तळ मजला,
विधानभवन, मुंबई येथे आणून द्याव्यात.

-----

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चा अध्यादेश क्रमांक 4- महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) अध्यादेश, 2016 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चा अध्यादेश क्रमांक 3- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, 2016 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चा अध्यादेश क्रमांक 1- महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, 2016 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चा अध्यादेश क्रमांक 2- महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, 2016 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2016 चा अध्यादेश क्रमांक 5- महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, 2016 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती :** अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :**सन 2015-2016 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सादर करणे.

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015-2016 करिता खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करीत आहे आणि तसे करीत असताना मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 205 आणि 203 (3) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन 2015-2016 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली आहे.

**सभापती :** सन 2015-2016 मधील खर्चाचे पूरक विवरणपत्र सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्राच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवलेल्या टपालखणाद्वारे वितरीत करण्यात येत आहेत.

-----

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :**सन 2015-2016 च्या खरीप व रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी 50 पैशापेक्षा कमी असलेल्या 15747 गावांमध्ये अतिरिक्त सवलती देण्याबाबत.

**मु.शी.:** सन 2015-2016 च्या खरीप व रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी 50 पैशापेक्षा कमी असलेल्या 15747 गावांमध्ये अतिरिक्त सवलती देण्याबाबत माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन.

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

राज्यातील सन 2015-2016 च्या हंगामातील पिकांची आणेवारी 50 पैशापेक्षा कमी असलेल्या गावांना सवलती जाहीर करण्याबाबतचे निवेदन मी करु इच्छितो.

सन 2015-2016 च्या खरीप हंगामातील पिंकाची आणेवारी 50 पैशापेक्षा कमी असलेल्या 15747 गावांमध्ये अतिरिक्त सवलती देण्याबाबतचा विषय शासनाच्या विचाराधीन होता. राज्यातील सन 2015-2016 च्या खरीप हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी 50 पैशापेक्षा कमी असलेल्या 15747 गावांमध्ये खालील प्रमाणे सवलती लागू करण्यात आल्या होत्या.

1) जमीन महसुलामध्ये सूट.

2) कृषि पंपाच्या चालू वीज देयकात 33.5 टक्के इतकी सूट.

3) शालेय व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना परीक्षाशुल्कात माफी.

4) आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकर्सचा वापर.

5) दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेती पंपाची वीज जोडणी खंडित न करणे.

वरील सवलती व्यतिरिक्त हंगामातील 15747 गावांमध्ये खालील अतिरिक्त सवलती लागू करण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे.

1) शेतीच्या निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती.

2) सहकारी पीक कर्जाचे पुनर्गठन.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

सभापती महोदय, सन 2015-2016 च्या रब्बी हंगामातील हंगामी पैसेवारी 50 पैशांपेक्षा कमी असलेल्या 1 हजार 53 गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करुन सवलती लागू करण्याचा विषय मंत्रिमंडळाच्या विचाराधीन होता.

राज्यातील सन 2015-2016 च्या रब्बी हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी 50 पैशापेक्षा कमी असलेल्या 1 हजार 53 गावांमध्ये (प्रामुख्याने अहमदनगर 408, सोलापूर 645) दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करुन त्यांना खालील सवलती लागू करण्याबाबत शासनाने मंजुरी दिली आहे.

1. जमीन महसुलात सूट.
2. कृषी पंपाच्या चालू देयकात 33.5 टक्के सूट.
3. शालेय /महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी.
4. आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी टँकरचा वापर.
5. दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाची वीज जोडणी खंडीत न करणे.
6. शेतीच्या निगडीत कर्जाच्या वसुलीस स्थगिती.
7. सहकारी पीक कर्जाचे पुनर्गठन.

याबाबत अहमदनगर जिल्ह्यातील 408 गावे आणि सोलापूर जिल्ह्यातील 645 गावे रब्बी हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी 50 पैशांपेक्षा कमी असल्यामुळे या गावांना वरील सवलती देण्यात येत आहेत.

---------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. या संदर्भात मंत्रिमंडळाने जो काही निर्णय घेतला त्या संदर्भातील निवेदन सभागृहाच्या नेत्यांनी येथे वाचले. आज सकाळी माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले. त्यांच्या अभिभाषणामध्ये राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा कोठेही उल्लेख नाही. ज्यावेळी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणा संदर्भातील चर्चा होईल त्यावेळी आम्हाला यावर बोलता येईल. आज सभागृहाच्या कामकाजपत्रिकेवर दुष्काळा संदर्भातील विषय नाही. तेव्हा सरकारला अशी कोणती घाई झाली की, त्यांना या संदर्भात निवेदन करावे लागले ? या संदर्भात सभागृहात चर्चा होण्याची आवश्यकता होती. सरकारने ही उपाययोजना केली होती तर त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात झाला असता तर ते अधिक संयुक्तिक झाले असते. माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे सरकार पुढील वर्षात कोणकोणते उपक्रम घेणार आहे याचा ऊहापोह असतो. सरकारने गेल्या वर्षभरात काय काय केले याचे एक प्रतिबिंब माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असते. आज राज्यात दुष्काळाची परिस्थिती अतिशय गंभीर असताना सुद्धा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्याचा कोणताही उल्लेख आलेला नाही. खरे म्हणजे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी अनुमोदन का दिले हे आम्हाला कळले नाही ? कशामुळे ही तडजोड झाली ?.....मी विषयावर बोलत आहे. हा विषय महत्वाचा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा ठराव...

श्री.गिरीष बापटः सभापती महोदय,...

**सभापती** : माझी संसदीय कार्य मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना मी बोलण्याची परवानगी दिलेली आहे. त्यांचे म्हणणे मांडून झाल्यावर आपण बोलावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी पॉईट ऑफ ऑर्डरवर उभा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांना मी बोलण्याची परवानगी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आपण कृपया खाली बसून बोलू नये. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी विनंती आहे की, त्यांनी निवेदनावरच बोलावे.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी निवेदनावरच बोलत आहे. आपण काल सभागृहाच्या कामकाजासंदर्भात एक बैठक बोलाविली होती. त्या बैठकीला मी उपस्थित नव्हतो, त्याबद्दल मी दिलगिर आहे. मी वर्तमानपत्रात बातमी वाचली की, सरकारमधील ज्येष्ठ मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी त्या बैठकीत अशी मागणी केली की, माननीय अध्यक्ष व माननीय सभापती यांनी दुष्काळाच्या चर्चेचा प्रस्ताव मांडावा. माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी तसा प्रस्ताव मांडला होता किंवा कसे हे मला माहीत नाही, कारण मी त्या बैठकीला उपस्थित नव्हतो. मी तसा उल्लेख यासाठी केला की, सरकारमधील ज्येष्ठ मंत्र्यांच्या अशा भावना असतील माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर त्यांनी खरोखर अनुमोदन दिले किंवा कसे अशी शंका मी उपस्थित केली. मी उपस्थित केलेल्या शंकेचे उत्तर सरकारला ज्यावेळी द्यायचे असेल त्यावेळी देता येईल.

आता याठिकाणी सभागृहाच्या नेत्यांनी निवेदन वाचले ते दिलासा देणारे होते त्याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. पण त्याचा समावेश माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करावासा का वाटला नाही ? याचा अर्थ सरकारला राज्यातील दुष्काळ महत्वाचा वाटत नाही का ? माननीय राज्यापालांच्या अभिभाषणामध्ये सरकारच्या कामाचे प्रतिबिंब असते, असे अभिप्रेत आहे. सरकारला दुष्काळाचे गांभीर्य नाही किंवा राज्यामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती नाही असे सरकारला सुचवावयाचे आहे काय, एवढाच माझा मुद्दा आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी जो गोंधळ सुरु होता त्यामुळे माननीय राज्यपाल आपल्या भाषणात काय बोलले हे ते आपण ऐकू शकला नाहीत. आपण त्यांचे अभिभाषण ऐकायला पाहिजे होते. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सविस्तर उल्लेख आहे की, दुष्काळावर मात करण्यासाठी खरीप हंगामातील 15 हजार 447 गावातील शेतकऱ्यांना 2 हजार 536 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे धोरणात्मक असते. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदा रब्बी हंगामाचा दुष्काळ जाहीर करण्याची भूमिका काल संध्याकाळी मंत्रिमंडळाने घेतली. आतापर्यंत असे कधीही घडले नाही. आपण खरीपाच्या हंगामासाठी दुष्काळ जाहीर करीत आलो आहोत. परंतु अहमदनगर आणि सोलापूर या जिल्ह्यांची सातत्याने मागणी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे..

होती की, त्यांचे जिल्हे रब्बी हंगामाचे आहेत. खरीप हंगामाचे नाहीत. या वर्षी या दोन जिल्ह्यांमध्ये अतिशय टंचाईसदृश्य परिस्थिती आहे तेव्हा या जिल्ह्यांमध्ये दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी होती. तेव्हा काल संध्याकाळी मंत्रिमंडळाने तसा निर्णय घेतला. मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय काल जाहीर केला असता तर उद्या सभागृह सुरु होणार असल्यामुळे सभागृहात का निवेदन करण्यात आले नाही, अशी हरकत उपस्थित करण्यात आली असती. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये धोरणात्मक निर्णय असतात. आपण असे निर्णय घेतच असतो. यामध्ये आणखी काही गावांची वाढ होऊ शकते. तेव्हा सभागृहाच्या निदर्शनास आणण्यासाठी निवेदन केलेले आहे. आपण पहिल्यांदाच रब्बी हंगामासाठी सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यांसाठी असा निर्णय घेत आहोत.

-----

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मृ.शी :** विधेयकांना संमती व अधिसंमती

(प्रेस : येथे सोबत जोडलेली विधेयकासंबंधीची यादी छापावी. )

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** सभापती तालिका नामनिर्देशित करणे

**सभापती :** मी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम 8 (1) अन्वये खालील सभासदांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित करतो :-

1. श्री.विनायकराव मेटे
2. ॲड.अनिल परब
3. श्री.रामराव वडकुते
4. श्री.मुझफ्फर हुसेन

---------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत 2014 सालातील कापसाचे पैसे न मिळाल्याबाबत**

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, अतिशय महत्त्वाच्या आणि गंभीर विषयाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. सभागृहाच्या नेत्यांनी दुष्काळासंबंधी आणि त्या संदर्भात शासनाने केलेल्या तरतुदीबाबत नुकतेच भाष्य केले. त्यावर जो काही वाद-प्रतिवाद व्हायचा होता तो झाला. आजच्या घडीला 15,500 गावांमध्ये दुष्काळ आहे. असे असताना राज्यातील 450 शेतकऱ्यांनी 2014 मध्ये वर्धा जिल्ह्यातील सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये 20 हजार क्विंटल कापूस विकलेला असताना अद्यापपर्यंत त्यांचे 8.5 कोटी रुपये मिळालेले नाहीत. वास्तविक पाहता यामध्ये शासन प्रशासक असल्यामुळे शासनाची जबाबदारी असताना सुध्दा....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण कृपया खाली बसावे. आपणास 2014 सालात विकलेल्या कापसाचे पैसे अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना मिळाले नसल्याचे सांगावयाचे आहे, असे आपल्या बोलण्यातून निदर्शनास येते. मला वाटते हा मुद्दा आपल्याला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी उपस्थित करता येईल. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेच्या वेळी हा मुद्दा उपस्थित करावयाचा असल्यास आपल्याला माझ्या अधिकारात या विषयावर बोलण्याची परवानगी देईन.

आता माननीय सभागृह नेत्यांनी शोक प्रस्ताव मांडावा.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आता आधुनिक कृषी उद्योगाचे प्रणेते डॉ.भवरलाल हिरालाल जैन यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मला या शोक प्रस्तावामध्ये थोडासा भाग समाविष्ट करावयाचा आहे.

**सभापती** : ठीक आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आजच्या शोक प्रस्तावामध्ये काही भाग समाविष्ट करावयाचा आहे. त्यामुळे मी सभागृह नेत्यांना सांगू इच्छितो की, अगोदर विरोधी पक्ष नेत्यांना बोलू द्यावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहाचे नेते सभागृहात शोक प्रस्ताव मांडत आहेत. ते मांडत असलेल्या शोक प्रस्तावाला अडथळा आणण्याचा माझा उद्देश नव्हता. हा शोक प्रस्ताव

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

मांडत असताना मी निदर्शनास आणून देतो की, मागच्या वर्षात या राज्यामध्ये 3,228 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यांनी आपली जीवन यात्रा संपविली आहे. यामागे नापिकीची कारणे असतील, कर्जबाजारीपणाची कारणे असतील किंवा पिकविलेल्या शेती मालाला योग्य भाव न मिळणे ही कारणे असतील. या प्रकरणी कोणाला जबाबदार धरायचे हा वेगळा विषय आहे. महोदय, मी अतिशय संवेदनशील मुद्दा मांडत आहेत. या विषयी मी कोणाला दोष देत नाही. परंतु कमीत कमी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या बाबतीत या सभागृहाने शोक व्यक्त करावा,एवढीच माझी मागणी आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आम्हाला असे करण्यास हरकत नाही. परंतु या राज्यात 10 वर्षांपूर्वी आत्महत्या होण्यास सुरुवात झाली आहे. या आत्महत्या होण्यास या क्षणापासून सुरुवात झाली नाही. विरोधी पक्ष सत्तेवर होता त्या काळात सर्वाधिक आत्महत्या झाल्या आहेत. तुम्ही जर तुमच्या काळात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती शोक प्रस्ताव आणला असता तर....

(विरोधी पक्षाचे काही सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या शोक प्रस्तावात त्यांना काही ॲडीशन करावयाचे आहे असे सांगितल्यामुळे मी त्यांना बोलण्याची संधी दिली होती. काल सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठकीमध्ये डॉ.भवरलाल जैन यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव घेण्याबाबत आपण एकमताने संमती दिली होती. त्यामुळे आता अधिक चर्चा न करता सभागृहाच्या नेत्यांनी शोक प्रस्ताव मांडावा.

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, एखाद्या व्यक्तीच्या शोक प्रस्तावामध्ये अडथळा आणणे हे या सभागृहाचे दुर्दैवं आहे. सभागृहात एखाद्या व्यक्तीच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडल्यानंतर अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित करणे अत्यंत दुर्दैवी आहे. मला वाटते ही प्रथा, परंपरा होता कामा नये.

श्री.सुनील तटकरे : महोदय, या ठिकाणी जे चुकीचे बोलण्यात आले आहे ते रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

श्री.एकनाथराव खडसे : ठीक आहे. आपले म्हणणे बरोबर आहे. काढून टाकावे.

**सभापती** : मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना सांगतो की, आपण या विषयाचे गांभीर्य घालवू नये. आता माननीय सभागृह नेत्यांनी शोक प्रस्ताव मांडावा. ..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** शोक प्रस्ताव

**मु.शी.:** डॉ.भवरलाल हिरालाल जैन यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, आधुनिक कृषी उद्योगाचे प्रणेते डॉ.भवरलाल हिरालाल जैन यांच्या दु:खद निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"आधुनिक कृषी उद्योगाचे प्रणेते डॉ.भवरलाल हिरालाल जैन यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

सभापती महोदय, आधुनिक कृषी उद्योगाचे प्रणेते डॉ.भवरलाल हिरालाल जैन यांचा जन्म 12 डिसेंबर, 1937 रोजी जळगांव जिल्ह्यातील वाकोद येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.कॉम.एलएल.बी. पर्यंत झाले होते.

कै.डॉ.जैन यांनी सुरुवातीस काही काळ वकिली केली होती. त्यानंतर त्यांनी सन 1963 मध्ये जळगाव जिल्ह्यातील वाकोद येथे शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंचा छोटा व्यवसाय सुरु केला. त्यातूनच त्यांनी सन 1978 मध्ये पपई या कृषी उत्पादनापासून पपेन निर्मितीच्या उद्योगातून आपल्या कृषी औद्योगिक क्षेत्रातील जैन पाईप, जैन इरिगेशन, जैन प्लास्टिक, जैन फ्रुट प्रोसेसिंग यासारख्या उद्योगांची भारतभर उभारणी केली. भारतासह जगभरातील शेतकऱ्यांना ठिबक आणि उच्च कृषी तंत्रज्ञानाद्वारे पाणी बचतीसह समृध्द व प्रगत शेतीचा मंत्र दिला. आधुनिक कृषक साधक म्हणूनच त्यांनी आपली नवी ओळख निर्माण केली.

कै.डॉ.जैन यांनी कृषी विज्ञान व औद्योगिक क्षेत्रात केलेल्या असामान्य कामगिरीबद्दल सन 2008 मध्ये केंद्र सरकारने 'पद्मश्री' किताब देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. तसेच कोकण कृषी विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, महात्मा फुले विद्यापीठ, राजस्थान व तामिळनाडू विद्यापीठ या चार विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. त्याचसोबत राज्यातील तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले होते.

कै.डॉ.जैन यांनी कृषी औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांसोबत अनुभूती स्कूलच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षणाचा पाया घातला. जळगाव येथे वैशिष्ट्यपूर्ण आणि भव्य असे राष्ट्रीय दर्जाचे

..5..

श्री.एकनाथराव खडसे....

ऐतिहासिक असे महात्मा गांधी तिर्थ हे स्मारक उभे केले. कांताबाई जैन मल्टिपर्पज फाऊंडेशनच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम सुरु केले. जळगाव जिल्ह्यातील शेतीसोबत औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

शेतकऱ्यांचे आयुष्य सुखी आणि समृध्द व्हावे हा ध्यास कै.डॉ.जैन यांनी आयुष्यभर जोपासला. कृषी क्षेत्रातील नवनवीन प्रयोगांना त्यांनी सदैव चालना दिली. जैव तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया उद्योग, सिंचनातील नवीन नवीन प्रयोग आदिंबाबत त्यांच्या नेतृत्वाखालील जैन उद्योग समूहाने केलेली कामगिरी महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील कृषी क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण आहे. महात्मा गांधीजींच्या विचारांवर निष्ठा असणारे डॉ.जैन हे तरुणांसाठी उद्यमशिलतेचे नेहमीच प्रेरणास्त्रोत राहिले आहेत. भारतीय शेतीला आधुनिकतेची दिशा देणारे, त्यासाठी सदैव प्रयोगशील राहणारे आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारे डॉ.जैन हे द्रष्टे उद्योजक होते. त्यांनी पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन कृषी आणि सिंचन क्षेत्रात क्रांती घडविली. त्या कालखंडात पाण्याच्या संदर्भात नियोजन करणे, कमी पाण्यामध्ये अधिक शेती मालाचे उत्पादन करणे यासाठी ठिबक सिंचनाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभर व देशभर त्यांनी आपल्या उद्योग समूहाच्या माध्यमातून जाळे उभे केले. त्या कालखंडात पाण्याचा प्रत्येक थेंबन्थेंब वाचविला पाहिजे आणि अधिक उत्पादन मिळाले पाहिजे या बाबत त्यांनी केलेली सुरुवात आजच्या कालखंडात किती उपयुक्त ठरते हे शेतकरी आज अनुभवत आहेत. ज्या कालखंडामध्ये पीव्हीसी पाईपचा वापर होत नव्हता किंवा ते तंत्रज्ञान या देशात आलेले नव्हते त्या कालखंडात पीव्हीसी पाईपचे तंत्रज्ञान या देशात आणून शेती पध्दतीमध्ये एक सुटसुटीत व्यवस्था त्यांनी निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कृषी क्षेत्रातील ठिबकची क्रांती असेल, पीव्हीसी पाईपची क्रांती असेल आणि अगदी अलीकडे जैविक शेतीच्या संदर्भात त्यांनी नव्याने संशोधन निर्माण केले.

एफ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

टिश्यू कल्चरच्या माध्यमातून नवनवीन रोपे तयार केली, मग त्यामध्ये केळीचे टिश्यू असेल किंवा इतर फळांच्या संदर्भातील टिश्यू असेल. कमी कालावधीत, कमी श्रमात, कमी पाण्यात अधिक उत्पादन देणाऱ्या शेतीतील पिकांच्या नवीन पध्दती विकसित केल्या आणि त्यानुसार फार मोठ्या प्रमाणात क्रांतीला सुरूवात झाली. त्यामुळे त्यांना देशाच्या तत्कालीन माननीय राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते 'पद्मश्री' किताब प्रदान केला. अशा या ज्येष्ठ उद्योग महर्षीचे गुरूवार, दिनांक 25 फेब्रुवारी, 2016 रोजी दु:खद निधन झाले. मी त्यांच्या निधनाबद्दल विधानमंडळाच्या माध्यमातून तीव्र शोक व्यक्त करतो.

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेते) : सभापती महोदय, श्रीमान भवरलालजी जैन यांचे दिनांक 25 फेब्रुवारी, 2016 ला दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल मांडलेल्या शोक प्रस्तावाला अनुमोदन देण्यासाठी व शोक व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ठिबक सिंचनाच्या माध्यमातून केवळ महाराष्ट्र किंवा देशामध्येच नव्हे तर जगभरातील शंभराहून अधिक देशांमध्ये त्यांनी क्रांती घडविली. त्यांनी शेतकऱ्यांचे आयुष्य सुखी, समृध्द व्हावे म्हणून स्वत:चे आयुष्य वेचले. त्यांनी गांधींजींच्या विचार कार्याचा प्रचार, प्रसार यासाठी स्वत:ला वाहून घेतले. आजचे तरूण उद्यमशिलतेचे प्रेरणा स्त्रोत म्हणून त्यांच्याकडे आदराने, गौरवाने पाहतात, त्या जैन इंजिनिअरिंगचे संस्थापक आदरणीय भवरलालजी जैन साहेबांचे नुकतेच निधन झाले. मी त्यांच्या पवित्र स्मृतीला भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

सभापती महोदय, वाकोद, ता. जामनेर येथे दि. 12 डिसेंबर, 1937 रोजी जन्मलेल्या भवरलाल जैन साहेबांनी जळगाव ही आपली कर्मभूमी मानून आयुष्यभर काम केले. जळगाव ही कर्मभूमी असली तरी त्यांच्या कार्याचा दरवळ जगभरात पसरला होता. जैन उद्योग समुहाच्या तसेच कृषी क्षेत्रातील संशोधन व तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून त्यांनी राज्याचा व देशाचा जगात गौरव वाढविला. त्यांनी सुरू केलेल्या जैन उद्योग समुहाच्या माध्यमातून आज हजारो युवक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या रोजगार मिळवित आहेत. त्यामुळे "लाखोंचा पोशिंदा" अशी त्यांची ओळख करून दिल्यास चुकीचे ठरू शकणार नाही. भवरलाल जैन साहेबांनी कृषी क्षेत्रातील संशोधनाला प्रोत्साहन दिले, सढळ हाताने मदत केली. त्यांच्या पुढाकाराने कृषी संशोधनाच्या क्षेत्रात मोठी क्रांती झाली. त्यांनी विकसित केलेल्या केळीच्या उतिसंवर्धित रोपांच्या तंत्रज्ञानामुळे केळीच्या उत्पादकतेमध्ये मोठी वाढ झाली व त्याचा फायदा सर्वसामान्य शेतकऱ्यांना झाला. सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही जैन साहेबांचे मोठे योगदान आहे. त्यांचे संशोधन व त्यांनी उभ्या केलेल्या संस्था खऱ्या अर्थाने लोकोपयोगी व शेतकऱ्यांच्या, सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडवणाऱ्या आहेत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

सभापती महोदय, जैन साहेबांनी जैन समुह उद्योगाच्या माध्यमातून हजारो लोकांचे आयुष्य घडविले. त्यांनी भवरलाल उद्योग-व्यवसायाच्या पलीकडे जाऊन सामाजिक बांधिलकी जोपासली. जळगावचे नाव जगाच्या नकाशावर नेताना त्यांनी आपल्या मातीशी नाते कधीही तोडले नाही. त्यांच्या निधनाने सिंचन क्रांतीचा प्रणेता आपण गमाविलेला आहे. त्यांच्या जाण्याने राज्याची व देशाची कधीही भरून न येणारी हानी झाली आहे. जगातल्या शेतकऱ्यांच्या, अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी काम करणारा महात्मा आपल्यातून निघून गेला आहे. मी त्यांच्या कार्याला भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

मी विरोधी पक्षनेता या नात्याने विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने भवरलाल जैन साहेबांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. धन्यवाद !

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते, सन्माननीय श्री. एकनाथराव खडसे साहेबांनी मांडलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय डॉ. भवरलाल जैन यांच्या संदर्भातील हा शोक प्रस्ताव आहे. एकंदरितच आपण त्यांच्या जीवनात डोकावले तर असे दिसेल की, गांधीवादाचा विचार डॉ. भवरलाल साहेबांच्या आयुष्यात महत्त्वाचा होता. स्वातंत्र्यपूर्व काळ असो किंवा स्वातंत्र्योत्तर काळ असो दोन्हींमध्ये गांधींजींचा विचार हा आपल्या राष्ट्रातच नाही तर जगभर पसरलेला होता, पसरलेला आहे, याचे प्रत्यंतर आपल्याला आल्याशिवाय राहत नाही. सन 1947 मध्ये देश स्वतंत्र झाला. पंडित जवाहरलाल नेहरू भारताचे पहिले पंतप्रधान झाले. आता देशासमोर गांधीजींचा विचार कसा न्यायचा या विचारात असताना देशात मूलभूत विकासाच्या गोष्टी करायच्या हा एक विचार होता. सन 1947 च्या काळात 7 लक्ष खेड्यांचा विकास म्हणजेच या देशाचा, राष्ट्राचा विकास अशी कल्पना महात्मा गांधीजींनी मांडली आणि त्याला धरून 2 उद्योगपतींनी आपले आयुष्य त्या विचारांमध्ये झोकून दिले, त्यामध्ये एक जमनालाल बजाज होते आणि दुसरे भवरलाल जैन होते. मी त्यांचा आवर्जून उल्लेख करतो. गावांचा विकास करायचा असेल तर आपल्या शेतीप्रधान संस्कृतीमध्ये सर्व काही करायचे, विकास करायचा हे तत्व मनाशी बाळगून डॉ. भवरलाल जैन यांनी आयुष्यभर काम केले. कृषी साधक, सूक्ष्म सिंचनाचे प्रणेते, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी, ठिबक सिंचन पध्दतीचे प्रणेते अशा सर्व बिरूदांचा उल्लेख त्यांचा मान-सन्मान राखताना करीत आहोत. सदनाचे नेते सन्माननीय श्री. एकनाथराव खडसे साहेबांनीही त्याचा उल्लेख केला. मी काँग्रेस पक्षाच्या वतीने डॉ. भवरलाल जैन यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, आपण डॉ. भवरलाल जैन यांच्या निधनामुळे कृषी व औद्योगिक क्षेत्रातील एक जाणकार मार्गदर्शक गमाविलेला आहे. 2 महिन्यांपूर्वी माझी त्यांच्याशी जैन हिल्स येथे भेट झाली होती. तेथे त्यांनी आगामी काळात शेती व शेती उत्पादनाच्या बाबतीत कोणकोणते नवनवीन प्रयोग करता येतील याची एक ओझरती कल्पनाही दिली होती. स्वतः त्यांनी अनेक प्रयोग केले. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन यशस्वी प्रयत्न केले आणि त्या प्रयोगातून ते सिध्द झाले. त्यांनी स्वतः त्यांच्या चिरंजीवांना सांगून मला त्यांची जैन हिल्सवरची बागही दाखविली. आंब्यांची लागवड कोकण व इतर भागात प्रचंड प्रमाणात आहे. वर्षांनुवर्षे ही झाडे प्रचंड प्रमाणात, विखुरलेली वाढतात. जैन यांनी प्रयोग केला आणि त्या झाडांची वरचेवर आटोपशीर छाटणी करून त्यातून अधिक उत्पन्न कसे मिळविता येईल ते पाहिले, त्यांनी उत्पादन काढून ते सिध्द करून दाखविले.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या हिताचे, शेती उत्पन्न वाढीचे अनेक प्रयोग त्यांनी केले, ज्याला आपण व्हॅल्यू ॲडिशन म्हणतो. सरकारी नोकरीमध्ये त्यांची निवड झाली हाती. पण ती नाकारून ते उद्योजकतेकडे वळले आणि त्यांनी उद्योगामध्ये फार वरचे स्थान गाठले. गेल्या महिन्यात "मेक इन इंडिया" हा कार्यक्रम झाला, त्यामध्ये जैन इरिगेशन या कंपनीने महाराष्ट्र सरकारसह कोका कोला या आंतरराष्ट्रीय कंपनीबरोबर एक सामंजस्य करार केला. त्यामध्ये खास करून विदर्भ, मराठवाडा येथील संत्रे, डाळींब, पेरू या फळांवर प्रक्रिया करण्याचा विचार झाला. कोका कोलाचा ट्रॉपिकोना हा ब्रँड जगभरात एक क्रमांकाचा ब्रँड आहे आणि त्याच धर्तीवर आपल्या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेली फळे, त्यांचा रस, पल्प यांच्या उत्पादनाचे मार्केटिंग भारतात मोठ्या प्रमाणात व्हावे आणि तो प्रयोग महाराष्ट्रापासून सुरू व्हावा असा सामंजस्य करार जैन इरिगेशन लि. या त्यांच्या कंपनीमार्फत केला.

..G

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुभाष देसाई..........

आणखी काही उद्योग महाराष्ट्रामध्ये कसे सुरु करता येतील आणि शेती उद्योग कसे अधिक फायदेशीर करता येतील, याबाबतचे मार्गदर्शन त्यांनी आपल्या उद्योग समुहाला, चिरंजिवांना आणि आपणा सर्वांना केले आहे. त्यामुळे सन्माननीय डॉ.भवरलाल हिरालाला जैन हे आज आपल्यातून गेले असले तरी त्यांची प्रेरणा आणि आशीर्वाद महाराष्ट्राला नेहमीच लाभदायक ठरतील, असा विश्वास मी व्यक्त करतो. माझ्यातर्फे, शिवसेना पक्षातर्फे, उद्योग विभाग आणि उद्योजकांतर्फे मी त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि थांबतो.

----------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री गुरुमुख जगवानी (जलगांव स्थानीय प्राधिकारी संस्था) : सभापति महोदय, "महत सहल हमें जानों, कृता है फलक बरसों, तब खाक के परदे से इन्सान निकलते है." दिनांक 12 दिसम्बर 1937 को खानदेश की खाक में श्री भवरलाल जैसा एक अजिब इन्सान पैदा किया. अंग्रेजी का एक कोट है. "He came, he saw, he conquered." श्री भवरलाल जैन जी इस दुनिया में आए, उन्होंने दुनिया देखी और उन्होंने अपने कर्मों से दुनिया जीती. इस सदन को बताते हुए मुझे बड़ा फक्र महसूस होता है कि स्वर्गीय भवरलाल जैन जी के साथ बहुत सारी मुलाकातें, बातें और यादें रही है. मेरी यह खुदकिस्मती है कि एक फॅमिली मेम्बर की हैसियत से उन्होंने मुझे जाना. मैंने उन्हें एक अच्छे मार्गदर्शक के रुप में देखा. उनका दिल समाज के सभी लोगों के लिए धड़कता था. मैं उनको बहुआयामी व्यक्ति मानता हूं. कृषि, शिक्षा, धर्म, आधुनिक ज्ञान, गांधीवाद, साहित्य, खेलकूद और संस्कृति जैसे बहुत सारे क्षेत्र से उनका संबंध रहा है. औरंगाबाद के एक शायर का कहना है कि "खुद की खातिर, न जमाने के लिए जिंदा हूं, कर्ज मिट्टी का चुकाने के लिए जिंदा हूं." श्री भवरलाल जैन जी की जिंदगी भर की फिलॉसाफी यही रही कि वे अपनी जमीन से जुड़े रहे. उन्होंने पूरी जिंदगी इसी सोच में गुजारी कि हमारी जमीन किस तरह ज्यादा से ज्यादा फसल दे सकें, हमारे किसान किस तरह ज्यादा से ज्यादा फसल ले सकते है. महाराष्ट्र के किसानों को किस तरह माडर्न टेक्नॉलॉजी से जोड़ा जा सकता है. मिडल क्लास ओर गरीब किसानों की मदद के लिए डॉ.भवरलाल जैन जी की बाँहें हमेशा खुली रहती. जैन ग्रूप के जरिए ऐसे छोटे किसानों को फ्री ट्रेनिंग की पहल और उनकी हर मदद के लिए वे तैयार रहते थे. ड्रिप सिस्टम की टेक्नॉलॉजी को महाराष्ट्र के साथ पूरे भारत में इन्ट्रोड्युस कराने का सेहरा डॉ.भवरलाल जैन जी को जाता है. इसी तरह पीव्हीसी पाइप या एसडीपी पाइप के माध्यम से कृषि क्षेत्र में जो क्रांति हुई उसमें डॉ.भवरलाल जैन जी का बहुत बड़ा योगदान रहा है. यही वजह है कि दुनिया के 130 देशों में जैन ग्रूप के कई प्रोडक्ट एक्सपोर्ट किए जाते है. केला, हरी सब्जी, फल, अनाज, कपास और दाल की ज्यादा से ज्यादा फसल के लिए काफी संशोधन किया था. ऊर्जा, सोलर एनर्जी, बायोगॅस जैसे फिल्ड में भी उनका अहम योगदान रहा है. यही कारण है कि इस देश में और बाहर के कई देशों में उन्हें कई सम्मानों से नवाजा गया. भारत सरकार के

...3.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री गुरुमुख जगवानी.........

द्वारा उन्हें पद्मश्री से नवाजा गया. इरीगेशन असोसिएशन ऑफ युएसए की ओर से इन्हें क्राफिट्रिएट मेमोरियल जैसे अवार्ड से सम्मानित किया गया था. कई भारतीय युनिवर्सिटी की ओर से उन्हें पीएचडी और डिप्लोमा इन लिटरेचर के सम्मान से नवाजा गया था. डॉ.भवरलाल जैन जी ने अपने एक भाषण में कहा था कि, "तुम्हारे जन्म के वक्त जिस तरह यह दुनिया थी, तुम्हारे मरने से पहले इस दुनिया को सुंदर ओर खुबसुरत बनाओ. चलो इसी तरह से सजाए, इसे यह दुनिया हमारी लगे." इसमें कोई शक नहीं कि डॉ.भवरलाल जैन जी ने दुनिया को अपने कर्मों से सुंदर बनाने की कोशिश की. इस दुनिया से डॉ.भवरलाल जैन के चले जाने से हमने एक बड़े इन्सान को खोया है. इनके चले जाने से एक युग का अंत हुआ है. इनके देहांत से पूरी दुनिया को दुख हुआ है. मैं इस सदन के माध्यम से डॉ.भवरलाल जैन जी को श्रध्दांजलि पेश करता हूं और जैन परिवार, जैन ग्रूप के दुख में मैं शामिल हूं. मैं प्रार्थना करता हूं कि भगवान इनकी आत्मा को शांति प्रदान करें और हमें इनके बताए हुए रास्तें पर चलने की सोच दे. मैं इतना ही कहना चाहूंगा कि "किश्तियां रह जाती है, तूफानं चले जाते है, यादें रह जाती है, इन्सान चले जाते है. प्यार कम नहीं होता किसी के दूर चले जाने से. बस दिल में दर्द होता है, इनकी याद आने से." इतना कह कर मैं अपना भाषण पूरा करता हूं, धन्यवाद.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** डॉ.भवरलाल हिरालाल जैन यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी शोक प्रस्ताव मांडला असून सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय गटनेत्यांनी त्यावर आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

आधुनिक कृषी उद्योगाचे प्रणेते डॉ.भवरलाल जैन यांचा जन्म दिनांक 12 डिसेंबर, 1937 रोजी जळगाव जिल्ह्यातील वाकोद येथे झाला. कै.जैन यांनी सुरुवातीस काही काळ वकिली केली होती. त्यानंतर त्यांनी सन 1963 मध्ये जळगाव जिल्ह्यातील वाकोद येथे शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तुंचा छोटा व्यवसाय सुरु केला. त्यातूनच त्यांनी सन 1978 मध्ये पपई या कृषी उत्पादनापासून पपेन निर्मितीच्या उद्योगातून आपल्या कृषी औद्योगिक क्षेत्रातील जैन पाईप, जैन इरिगेशन, जैन प्लास्टिक, जैन फ्रुड प्रोसेसिंग यासारख्या नामवंत उद्योगांची भारतभर उभारणी केली. भारतासह जगभरातील शेतकऱ्यांना ठिबक आणि उच्च कृषी तंत्रज्ञानाव्दारे पाणी बचतीसह समृध्द व प्रगत शेतीचा मंत्र देणारे 'आधुनिक कृषक साधक' म्हणूनच त्यांनी आपली नवी ओळख निर्माण केली. शेतीशी निगडित विविध प्रकल्पांच्या माध्यमातून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर व्हावा, यादृष्टीने ठिबक सिंचनाचा शोध लावून आधुनिक, उच्च व प्रगत तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आणि जलव्यवस्थापन तंत्राच्या माध्यमातून प्रचार व प्रसार करुन एक वेगळी सामाजिक चळवळ उभी केली. त्यांनी कृषी आणि सिंचन क्षेत्रात क्रांती घडवून आणली. कै.जैन यांचे कृषी औद्योगिक क्षेत्राबरोबरच सामाजिक विकासामध्ये देखील फार मोठे योगदान राहिलेले आहे. त्यांनी अनुभुती स्कूलच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षणाचा पाया घातला. जळगांव येथे राष्ट्रीय दर्जाचे ऐतिहासिक असे महात्मा गांधी तिर्थ उभे केले. कांताबाई जैन मल्टिपर्पज फाऊंडेशनच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम सुरु केले. जळगांव जिल्ह्यातील कृषी औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी त्यांनी विशेष योगदान दिले होते.

कृषी विज्ञान व औद्योगिक क्षेत्रात असामान्य कामगिरीबद्दल सन 2008 मध्ये कै.डॉ.जैन यांना भारत सरकारने पद्मश्री किताब देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. कोकण कृषी विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, महात्मा फुले विद्यापीठ, राजस्थान व तामिळनाडू विद्यापीठ या

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती.........

चार विद्यापीठांनी त्यांना डॉक्टरेट पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला होता. त्याचबरोबर राज्यातील तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले होते.

अशा या कृषी व सिंचन क्षेत्रात क्रांती घडवून आणणाऱ्या, ठिबक सिंचनाचे जनकअसलेल्या, गांधीवादी विचाराच्या ज्येष्ठ उद्योग महर्षीचे गुरुवार, दिनांक 25 फेब्रुवारी, 2016 रोजी दु:खद निधन झाले आहे. शेतीमधील नवनवीन तंत्रज्ञानासाठी व पाणी परिस्थितीसाठी आयुष्यभर काम करणाऱ्या डॉ.भवरलाल जैन यांच्या स्मृतीस मी भावपूर्ण श्रध्दांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी उभे राहून शोकप्रस्ताव संमत करावा, अशी माझी विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

----------

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 10 मार्च, 2016 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 1 वाजून 18 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 10 मार्च, 2016 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION